**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक ९४ वा | सोमवार २१ ऑगस्ट २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 94 | Date : 21/08/2023 | blow : Monday | Page 4 | Price 4

## टोकाच्या हवामानबदलाचा अंटार्क्टिकाला फटका



वॉशिंग्टन : पृथ्वीवरील सर्वात दुर्गम आणि निर्जन ठिकाणांपैकी एक असलेल्या अंटार्क्टिका या दक्षिण ध्रुवीय प्रदेशालाही जागतिक हवामानबदलाचा दुष्परिणाम जाणवू लागला आहे. तेथे आता तापमानाच्या चढ-उतारांच्या विस्कळीत नोंदी होत आहेत. तसेच लहरी हवामानाचे प्रमाण वाढले आहे.

मानवाने केलेल्या प्रदूषणामुळे झालेल्या हवामान बदलाची झळ या सुदूर दक्षिण ध्रुवीय प्रदेशालाही बसत आहे. हवामान बदलाची **। पान २ वर**

# रशियाची चंद्रमोहिम अयशस्वी, लुना-२५ चंद्रावर कोसळलं..



मुंबई : रशियाची चंद्रमोहिम अपयशी ठरल्याची मोठी अपडेट समोर आली आहे. रशियाचं लुना-२५ अंतराळयान चंद्रावर क्रॅश झालं आहे. रशियन अंतराळ संशोधन संस्था रोसकॉसमॉस ने याबाबत अधिकृत माहिती दिली आहे. रशियाचं लुना-२५ अंतराळयान २१ ऑगस्ट रोजी चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करण्याचा प्रयत्न करणार होतं. रशियाने तब्बल ४७ वर्षानंतर चंद्रमोहिम हाती घेतली होती. मात्र, ही चंद्रमोहिम अयशस्वी ठरली आहे. जवळपास पन्नास वर्षानंतर रशिया चंद्रावरील संशोधन करत आहे. रशियाने १० ऑगस्ट रोजी १९७६ मध्ये लुना-२४ पाठवले होते. त्या मोहिमेनंतर जवळपास पाच दशकांनंतर प्रथमच लुना-२५ अंतराळात पाठवण्यात आलं. त्याने चंद्राकडे जाण्याचा अधिक थेट मार्ग स्वीकारला होता. ११ दिवसांत म्हणजे २१ ऑगस्टला 'लुना-२५'चंद्रावर उतरणार होतं. हे यान अधिक शक्तीशाली आणि खर्चिक रॉकेटद्वारे चंद्राच्या दिशेने निघाले होते. यानाच्या हलक्या वजनाच्या डिझाईन आणि इंधन साठवणुकीच्या क्षमतेमुळे कमी वेळेत हे यान चंद्राच्या कक्षात पोहचलं होतं. मात्र, चंद्र मोहिम पूर्ण होण्याच्या आधीच हे अंतराळयान क्रॅश झालं आहे.

रशियन अंतराळ संशोधन संस्था रोसकॉसमॉस ने अधिकृतरित्या सांगितलं आहे की, अनियंत्रित कक्षेत फिरल्यानंतर रशियाचे लुना-२५ अंतराळ यान चंद्रावर कोसळलं आहे. रोस्कोसमॉसने सांगितलं की, लुना-२५ ला प्री-लँडिंग ऑर्बिटमध्ये असताना शंटिंग करण्यात तांत्रिक समस्या उद्भवली होती. त्यानंतर एक दिवसाने लुना-२५ कोसळल्याची माहिती समोर आली आहे. रोस्कोसमॉसने एका निवेदनात म्हटलं आहे की, लुना-२५ नियोजित कक्षेत न जाता वेगळ्या अनियंत्रित कक्षेत **। पान २ वर**

# 'चांद्रयान-३' साठी चंद्रापासून फक्त २५ किमी अंतर बाकी

## २३ ऑगस्टला 'यावेळी' चंद्रावर उतरणार



मुंबई : भारताच्या चांद्रयान-३ मोहिमेकडे सर्व जगाचं लक्ष लागलं आहे. चांद्रयान-३ च्या लँडर मॉड्युलला चंद्राच्या जवळ आणण्यासाठी अंतिम डिबूस्टिंग प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली आगे. आता चांद्रयान-३ चंद्राच्या अगदी जवळ पोहोचलं आहे. आज पहाटे २ ते ३ वाजण्याच्या सुमारास चांद्रयान-३ चंद्रापासून २५ किलोमीटर अंतरावर होतं. 'चांद्रयान-३' साठी पुढील २४ तास महत्वाचे आहेत. 'चांद्रयान-३' सोबत पाठवलेले विक्रम लँडर व्यवस्थित आहे. चांद्रयान योग्य पद्धतीने चंद्राच्या दिशेने जात आहे. त्यामुळे चिंता करण्याची गरज नाही, अशी माहिती भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात 'इस्रो'ने दिली आहे. चांद्रयान-३ चं काऊंटडाऊन सुरू झालं आहे. २३ ऑगस्टला चांद्रयान-३ संध्याकाळी ६ वाजून ०४ मिनिटांनी चंद्रावर उतरणार आहे. लँडिंग करण्यापूर्वी, मॉड्यूलची तपासणी होईल.

चांद्रयान-३ चंद्रावर उतरण्यासाठी फक्त ३ दिवस शिल्लक आहेत. आता विक्रम लँडर **। पान २ वर**

# निर्यात शुल्क वाढवून सरकारने कांद्याचे भाव पाडले, शरद पवार यांचा थेट आरोप



पुणे : कांद्याच्या भाव पडल्याने सर्वसामान्यांना दिलासा मिळाला असला, तरी शेतकऱ्यांना याचा फटका बसत आहे. कांद्याचे निर्यात शुल्क वाढवून सरकारने कांद्याचे भाव पाडले आहेत, असा थेट आरोप राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी केला आहे. केंद्र सरकारने कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला, मात्र या निर्णयाचा शेतकरी, व्यापारी यांच्यावर परिणाम होणार आहे.

शरद पवार यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात बोलताना केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. कांदा प्रश्नावरून त्यांनी सरकारला घेरलं. यासोबतच केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर यावरूनही मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. कांदा प्रश्नावर शरद पवार म्हणाले की, केंद्राने कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लागू केलं आहे. यामुळे कांद्याचे भाव पडले आहेत.

केंद्र सरकारने शनिवारी कांदा (जपळेप) निर्यात शुल्काबाबत मोठा निर्णय घेतला असून यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण आहे. केंद्र सरकारने कांद्यावर **। पान २ वर**

# हे शासन कलाकारांना संधी देणारे अन् त्यांचा सन्मान करणारे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



ठाणे : एखाद्या कलाकाराकडे कितीही प्रतिभा असली तरी त्याला संधी मिळणे महत्त्वाचे असते. हे शासन कलाकारांना संधी देणारे आणि त्यांचा सन्मान करणारे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.ठाणे महानगरपालिका व ठाणे दैनिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रीय छायाचित्र प्रदर्शन व पारितोषिक वितरण' सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संदीप माळवी, माजी महापौर नरेश म्हस्के, ठाणे दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष अनंत कांबळे, सचिव निलेश पानमंद, खजिनदार वैभव विरवटकर, मनोज सिंग व सहकारी पदाधिकारी, पारितोषिक विजेते छायाचित्रकार तसेच नागरिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी उपस्थित सर्व छायाचित्रकार, पत्रकारांना जागतिक छायाचित्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. छायाचित्रण ही कला नक्कीच सोपी नाही. यासाठी वेगळी दृष्टी लागते, प्रचंड मेहनत घ्यावी लागते.**। पान २ वर**

# राष्ट्रवादीचे माजी आमदार रमेश कदम यांची ८ वर्षांनंतर जामिनावर सुटका



मुंबई: राष्ट्रवादीचे माजी आमदार रमेश कदम यांची आठ वर्षांनंतर अखेर जामीनावर सुटका झाली आहे. अण्णा भाऊ साठी महामंडळ कथित घोटाळ्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला होता. आज न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. माजी आमदार रमेश कदम यांची आज ठाणे सेंट्रल जेलमधून सुटका करण्यात आली आहे. माजी आमदार रमेश कदम यांच्यावर अण्णा भाऊ साठे महामंडळामध्ये ३१२ कोटी रुपयांच्या घोटाळा केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. त्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर त्यांची रवानगी तुरुंगात करण्यात आली होती. आज न्यायमूर्ती राहुल रोकडे यांनी त्यांना सर्व गुन्ह्यांमध्ये जामीन मंजूर केला आहे. रमेश कदम यांना जामीन मिळाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी जल्लोष केला.

गेली आठ वर्षे ज्या माध्यमातून माझ्यावर आरोप झाले त्या आरोपांना मी सामोरं गेलो, न्यायालयाच्या चार्जशिटमध्ये जे आरोप होते त्यावर विचार करून मला जामीन दिला त्याबद्दल उच्च न्यायालय आणि सत्र न्यायालयाचा मी मनापासून आभारी आहे. माझ्यावर करण्याते आलेले आरोपांमध्ये तथ्य नाही. अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या माध्यमातून जो पैसा वाटला गेला तो कर्जरूपाने होता, तो आज ना उद्या मिळेल, ते कर्ज आहे, भ्रष्टाचार नाही. आता पुलाखालून बरंच राजकीय पाणी वाहून गेलं आहे. त्यामुळे माझ्या मूळ विधानसभा मतदारसंघाचा मला अजून अंदाज नाही. मी येत्या काही दिवसांत माझ्या मतदारसंघात जाणार आहे. माझ्या मतदारांशी बोलणार आहे. मगच सर्व राजकीय अंदाज घेऊन माझी भूमिका स्पष्ट करून निर्णय घेणार आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ घोटाळ्यात **। पान २ वर**

## आरोग्य विभागातील १२ हजार जागांसाठी पुढील आठवड्यात जाहिरात निघणार

मुंबई: आरोग्य विभागाची नोकर भरती अंतिम टप्प्यात असून पुढील आठवड्यात जवळपास १२ हजार जागांसाठी जाहिरात निघणार आहे. ठाण्यातील रुग्णांच्या मृत्यूनंतर आरोग्य सेवक भरतीला वेग आला असून पुढील आठवड्यात ११,९०३ जागांसाठी भरतीची जाहिरात निघणार आहे. आरोग्य विभागातील क आणि ड वर्गाच्या पदांसाठी ही जाहिरात असेल.

अनेक दिवसांपासून ही भरती प्रक्रिया रखडली होती, आता ठाण्यात घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर या प्रक्रियेला वेग आल्याचं दिसून आलं. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत असताना या भरती प्रक्रियेवर अनेक प्रश्नचिन्ह उभे करण्यात आले होते.'क' आणि 'ड' श्रेणीतील ११,९०३ जागांसाठी पुढील आठवड्यात ही जाहिरात निघण्याची शक्यता आहे. आरोग्य सेवकांच्या क आणि ड वर्गासाठी होणारी ही भरती एमपीएससी, राज्य निवड मंडळ आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांच्यामार्फत केली जाणार आहे. गट क' संवर्गात परिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्यसेवक, आस्थापनेवरील पदे यामध्ये लिपिक, टंकलेखक, वाहनचालक यासारख्या पदांचा समावेश आहे. तर 'गट ड' संवर्गात शिपाई, सफाई कामगार, कक्षसेवक यासारख्या पदांचा समावेश आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ पदे रिक्त असल्याने त्याचा भार कनिष्ठ अधिकाऱ्यांवर पडत आहे. या कार्यपद्धतीवर अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. त्यामुळे ही रखडलेली नोकर भरती पूर्ण करण्यासाठी वेग आलेला पाहायला मिळतंय. ठाणे पालिकेच्या कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात एकाच दिवसात १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. याप्रकरणी आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चौकशी समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत.

# ज्येष्ठ रंगकर्मी अशोक सराफ यांना सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे पुरस्कार प्रदान

## पद्म पुरस्कारासाठी अशोक सराफ यांच्या नावाची शिफारस करण्यात येईल.



पुणे : महाराष्ट्र शासनातर्फे पद्म पुरस्कारासाठी अशोक सराफ यांच्या नावाची शिफारस करण्यात येईल आणि शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर संशोधन करणाऱ्या १०० विद्यार्थ्यांना प्रत्येकी दीड लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

बालगंधर्व रंगमंदिर येथे श्री.मुनगंटीवार यांच्या हस्ते ज्येष्ठ रंगकर्मी अशोक सराफ यांना कीर्ति सौरभ प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे पुरस्कार-२०२३ प्रदान करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, ज्येष्ठ मूर्तीशास्त्र अभ्यासक गो. ब. देगलूरकर, भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत, प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवींद्रनाथ घाटे, अभिषेक जाधव आदी उपस्थित होते.

अशोक सराफ यांनी आपल्या अभिनयातून आनंदाचा झरा लोकांपर्यंत पोहोचवला असे सांगून श्री.मुनगंटीवार म्हणाले, त्यांना विनोदाचा बादशहा, विनोदवीर म्हटले जाते. समोरच्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे, प्रेक्षकांच्या हृदयावर राज्य करण्याचे कठीण कार्य त्यांनी अनेक वर्ष केले. त्यांनी आपल्या अभिनयातून समाजातील संस्कारही प्रकट केला, तर दुसरीकडे प्रशासनातील दोषही तेवढ्याच ताकदीने मांडले. अभिनयासोबत त्यांची शब्दफेकही ताकदीची आहे, असेही ते म्हणाले.

आज बाबासाहेब पुरंदरे जरी नसले तरी प्रत्येक घरात शिवाजी महाराजांचे जीवनकार्य पोहोचविण्याचे कार्य करणे ही त्यांना आदरांजली ठरेल, असे नमूद करून श्री.मुनगंटीवार म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या या जगात छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार प्रत्येक घरात पोहोचवला तर समाजात चांगली व्यक्तिमत्वे निर्माण होतील आणि देशाकडे कोणी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही. यादृष्टीने संशोधकाच्या भूमिकेतून प्रसाद तारे यांनी महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू पुस्तकरूपाने मांडल्याबद्दल त्यांनी लेखकाचे अभिनंदन केले.

महाराष्ट्र शासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरे करण्यात येत असून यानिमित्ताने छत्रपतींची वाघनखे परत देण्याची विनंती ब्रिटिश म्युझियमने मान्य केली आहे, अशी माहिती श्री.मुनगंटीवार यांनी दिली.

अशोकमामांविषयी प्रत्येकाच्या मनात आदराचे स्थान आहे असे नमूद करून पालकमंत्री श्री.पाटील म्हणाले, अशोक सराफ यांची कामगिरी सतत उंचावत गेली. त्यांनी जीवनात यशाची अनेक शिखरे गाठली. त्यांची नाटके हमखास यशस्वी ठरायची. त्यांचे अनेक चित्रपट, नाटके यशस्वी ठरले. आज कर्तृत्व आणि नम्रता एकाच ठिकाणी आढळत नाही, असे सुंदर मिश्रण अशोक सराफ यांच्या व्यक्तिमत्वात आणि बोलण्यात जाणवते. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर समाजाच्या भल्यासाठी अनेक माणसे चांगले काम करीत असल्याची खात्री पटते, असे त्यांनी सांगितले.

उच्च शिक्षण विभागाने संशोधनावर भर दिला असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर **। पान २ वर**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## ✻ सुविचार ✻

छटाकभर प्रेम शेरभर ज्ञानापेक्षा वरचढ असते.- जॉन वेरली

## संपादकीय

### कृतीवर भर द्यावा लागेल

खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या भारत जोडो यात्रेला संपूर्ण देशात जो उत्तम प्रतिसाद मिळाला, त्यापैकी सर्वाधिक प्रतिसाद महाराष्ट्रात मिळाला, अशी माहिती काँग्रेस नेत्यांनी दिली आहे. आता राहुल यांच्या नेतृत्वाखालील यात्रेचा दुसरा टप्पा गुजरातमधून सुरू होणार असून, त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीही पदयात्रेच्या माध्यमातून राज्य पिंजून काढणार आहे. या पदयात्रेनंतर बसयात्राही काढण्यात येणार असून भाजपच्या कारभारावर प्रकाशझोत टाकणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. काँग्रेससारखा पक्ष यात्रांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचत असेल तर त्याचे स्वागतच आहे. त्यामधून शेतकरी, तरुणवर्ग व महिलांचे प्रश्न अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडले गेले पाहिजेत. राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघांचा आढावा घेण्यासाठी काँग्रेसने निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. ते विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा घेऊन, पक्षाला आपला अहवाल सादर करणार आहेत. एकूण काँग्रेसने जागावाटपातही वरचढ राहण्याची रणनीती आखलेली दिसते. राज्यातून किमान २५ खासदारांचे बळ देण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आल्याची माहिती पटोले यांनी दिली आहे. गेल्यावेळी काँग्रेसचा लोकसभेत एकच खासदार निवडून आला होता. त्या तुलनेत एकदम २५ जागा मिळवणे हे स्वप्नवतच वाटणे स्वाभाविक आहे. परंतु, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण व्हावा म्हणून या प्रकारची उद्दिष्टे समोर ठेवावी लागतात. मुळात मविआत काँग्रेसला किती जागांचे वाटप केले जाते, यावर सगळे अवलंबून असेल. १९६० साली यशवंतराव चव्हाण पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. त्यानंतर त्यांनी राज्यातील काँग्रेसची सत्ता बळकट करण्यावर भर दिला. यशवंतरावांनी अंतर्गत उच्च–कनिष्ठ भेद डावलून, मराठा–कुणबी जाती समूहाचे राजकारण उभे केले. मराठा–कुणबी नेतृत्वाने अन्य जातींनाही मर्यादित वाव देत, सर्व ब्राह्मणेतर जातींचे नेतृत्व स्वतःकडे ठेवले. सवर्ण व दलित समाज यात स्पर्धा तीव्र होऊ न देता, दलित नेतृत्वाचे काँग्रेसमध्ये समावेश करण्याचे प्रयत्न झाले. तसेच ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद मागे टाकून ब्राह्मण नेतृत्वाशी सहकार्य ठेवले गेले. या सर्वांमुळे बहुजातीय सहमती यांच्या आधारावर काँग्रेस उभी राहिली. महाराष्ट्रातील काँग्रेसच्या वर्चस्वाचे सामाजिक आधार शोधू लागल्यास, या सर्व बाबी लक्षात घ्याव्याच लागतात. काँग्रेसला राज्यात पुन्हा सोनेरी दिवस दाखवायचे असतील तर पटोले यांना यशवंतरावांचीच सर्वसमावेशकता अंगीकारावी लागेल आणि निव्वळ चर्चेपेक्षा कृतीवर भर द्यावा लागेल

## राष्ट्रीय युद्ध स्मारक : शहिदांच्या त्याग, तपस्या, समर्पण, वीरताची शौर्यगाथा

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांगता सोहळ्यानिमित्त केंद्र सरकारच्या सूचनेनुसार राज्यात 'मेरी माटी मेरा देश' अर्थात 'माझी माती माझा देश'अभियान ०९ ऑगस्ट, २०२३ पासून सुरु झाले आहे. या सांगता सोहळ्याच्या निमित्त राज्यात 'मिट्टी को नमन, वीरों का वंदन' या घोषवाक्यासह देशभर आयोजित 'मेरी माटी– मेरा देश' अभियानाची सुरुवात झाली आहे. राज्यात ग्रामपंचायत, तालुकास्तर, जिल्हास्तरावर विविध उपक्रम यानिमित्त आयोजित केले जात आहेत. देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद शूरवीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शहिदांच्या कार्याचे स्मरण करण्यासाठी राजधानीत बांधण्यात आलेल्या 'राष्ट्रीय युद्ध स्मारक' या महान व ऐतिहासिक वास्तूचा इतिहास, त्याची वैशिष्ट्ये आणि महत्त्वाची ओळख करून देणारा तसेच देशाच्या शूर सैनिकांच्या स्मृतींच्या शौर्यगाथाविषयी महत्त्वपूर्ण माहितीपर लेख:

**राष्ट्रीय युद्ध स्मारक** भारत ही नेहमीच महान वीरांची भूमी राहिली आहे. देशाची एकता आणि अखंडता अबाधित ठेवण्यासाठी आपल्या वीर जवानांनी नेहमीच सर्वोच्च बलिदान देऊन देशाची आन बान शान राखली आहे.

आपल्या देशाने वीरांना नेहमीच सर्वोच्च सन्मान दिला आहे. यामुळेच आपल्या देशातील शूर शहिदांच्या स्मरणार्थ केंद्र सरकारने राष्ट्रीय युद्ध स्मारक बांधले आहे. आपल्या सैनिकांच्या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी आणि आपल्या देशाच्या वीरांच्या शौर्याला आदरांजली वाहण्यासाठी राष्ट्रीय युद्ध स्मारक बांधण्यात आले आहे.

**राष्ट्रीय युद्ध स्मारकाचा इतिहास** इंग्रजांनी १९३१ मध्ये देशातील हुतात्म्यांच्या स्मृतीला श्रद्धांजली म्हणून आणि सैनिकांच्या बलिदानाची आणि धैर्याची आठवण म्हणून इंडिया गेट बांधले होते. दुसरे महायुद्ध आणि तिसऱ्या अँग्लो–अफगाण युद्धात ८३,००० पेक्षा अधिक भारतीय सैनिकांनी आपले प्राण दिले, त्यापैकी इंडिया गेटवर १३,५१६ शहिदांची नावासह नोंद आहे. इंग्रजांच्या राजवटीत सहभागी झालेल्या सैनिकांची नावे इंडिया गेटवर लिहिली गेली आहेत. नंतरच्या सर्व महत्त्वाच्या युद्धांमध्ये हौतात्म्य पत्करलेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ सरकारने राष्ट्रीय युद्ध स्मारक आणि संग्रहालय बांधले आहे.

स्वातंत्र्यानंतर देशातील हुतात्म्यांच्या स्मृती प्रित्यर्थ राष्ट्रीय युद्ध स्मारक बांधण्याची संकल्पना सर्वप्रथम १९६० साली झाली. सन १९७२ मध्ये भारत–पाक युद्धात भारताच्या सैनिकांनी धैर्य दाखवून बांगलादेशाला स्वातंत्र्य मिळवून दिले आणि या विजयानिमित्त दिल्लीतील इंडिया गेटजवळ तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते अमर जवान ज्योती प्रज्वलित करण्यात आली. सध्या ही ज्योत राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या




चिरंतन ज्योतीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. सन २०१५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या बांधकामाला मान्यता दिली व वर्ष २०१९ मध्ये या स्मारकाचे बांधकाम पूर्ण झाले. हे स्मारक एका दगडी स्तंभाच्या स्वरूपात आहे व १५.५ मीटर उंच आहे आणि १९६२ मध्ये भारत–चीन युद्धादरम्यान देशाचे रक्षण करताना प्राण गमावलेल्या सैनिकांना श्रद्धांजली म्हणून त्याची संकल्पना करण्यात आली होती. या हुतात्म्यांच्या बलिदानाचे देशवासियांना सतत स्मरण करून देणारे राष्ट्रीय युद्ध स्मारकाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २५ फेब्रुवारी २०१९ रोजी करण्यात आले.

**राष्ट्रीय युद्ध स्मारकाची वैशिष्ट्ये**

देशाच्या शूर सैनिकांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ राष्ट्रीय युद्ध स्मारक बांधण्यात आले आहे, ज्यामध्ये १९४७, १९६२, १९६५, १९७२ आणि १९९९ च्या युद्धात बलिदान दिलेल्या सैनिकांचे इतिहास मांडले गेले आहे. याशिवाय या स्मारकात, श्रीलंका पीसकीपिंग ऑपरेशन्स, ह्युमॅनिटेरियन असिस्टन्स डिझास्टर रिलीफ (क–उद्य) ऑपरेशन्स, दहशतवाद विरोधी ऑपरेशन्स आणि युनायटेड नेशन्स पीसकीपिंग मिशन्समध्ये बलिदान दिलेल्या शहिदांचेही स्मरण करण्यात आले आहे. या स्मारकाच्या मध्यभागी एक स्मारक स्तंभ बांधण्यात आला आहे, जिथे शहिदांच्या बलिदानाची आठवण करून देण्यासाठी अमर जवान ज्योती प्रज्वलित करण्यात आली आहे. ही ज्योत २४ तास अखंड तेवत राहते आणि देशाच्या वीरांच्या बलिदानाची आठवण देत राहते. सन २०२२ मध्ये भारत सरकारने इंडिया गेटवर १९७२ मध्ये प्रज्वलित केलेल्या अमर–जवान ज्योतीचाही राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या अमर–ज्योतीमध्ये विलीन करण्यात आला आहे. स्मारकाच्या मध्यभागी असलेल्या स्मारक स्तंभाची एकूण ऊंची १५.५ मीटर आहे, जी एकूण चार चक्रांच्या मध्यभागी बांधली गेली आहे. ही सर्व चक्रे सैनिकांच्या विविध मूल्यांची स्थिती प्रकट करतात. स्मारक कॉम्प्लेक्स राजसी राजपथ आणि सेंट्रल व्हिस्टाच्या विद्यमान मांडणी आणि समरूपतेशी सुसंगत आहे. लँडस्केपिंगवर आणि आर्किटेक्चरच्या साधेपणावर भर देऊन वातावरणाचा एकसंधपणा राखला जातो. मुख्य स्मारकाव्यतिरिक्त, सैनिकांना 'परमवीर चक्र' या देशाच्या सर्वोच्च शौर्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या सैनिकांच्या तुकड्यांना समर्पित क्षेत्र आहे. राष्ट्रीय युद्ध स्मारकाभोवती, सैनिकांच्या हौतात्म्याच्या विविध मूल्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी चक्रव्यूहच्या आकारात चार चक्रे तयार करण्यात आली आहेत.

**सर्व चक्रांचे वर्णन**

अमर चक्र – अमर चक्र हे स्मारकाचे पहिले चक्र म्हणून स्थापित केले गेले आहे. या चक्रात रणांगणातील हुतात्म्यांच्या अमरत्वाचे प्रतीक असलेली सदैव प्रज्वलित अमर ज्योत प्रज्वलित करण्यात आली आहे. देशाच्या शूर जवानांच्या हौतात्म्याचे सतत स्मरण राहावे यासाठी हे चक्र तयार करण्यात आले आहे.

वीरता चक्र – दुसरे चक्र म्हणून बांधलेले वीरता चक्र, विविध युद्धांदरम्यान देशाच्या शहिदांनी दाखविलेले विलक्षण शौर्य प्रदर्शित करते. येथे विविध युद्धांमध्ये भारतीय सैनिकांनी दाखवलेल्या शौर्याचे चित्रण करणारी ६ भित्तीचित्रे बनवण्यात आली आहेत, जी भारतीय सैन्याच्या ६ मोठ्या युद्धांची जिवंत कहाणी आहे.

त्याग चक्र – स्मारकाचे तिसरे चक्र म्हणून त्याग चक्र देशाच्या सैनिकांच्या बलिदानाचे चित्रण करते. हे चक्र ग्रॅनाईटच्या विटांनी बनवलेल्या १६ भिंतींनी बनवलेले चक्र आहे, जे चक्रव्यूहसारखे बांधले गेले आहे. या सायकलचे वैशिष्ट्य म्हणजे येथे प्रत्येक ग्रॅनाईट विटेवर प्रत्येक शहीद जवानाचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले गेले आहे. आतापर्यंत देशातील सर्व शूर सैनिकांची नावे येथे नमूद करण्यात आली असून त्यांची संख्या सुमारे २६,००० आहे.

रक्षा चक्र – राष्ट्रीय युद्ध स्मारकाचे शेवटचे वर्तुळ म्हणून रक्षा चक्र बांधले गेले आहे, जे एका वर्तुळात लावलेल्या ६०० झाडांची रांग आहे. येथे लावलेली झाडे देशाच्या सीमेवर देशाच्या रक्षणासाठी उभ्या असलेल्या सैनिकांचे प्रतिनिधित्व करतात, ज्यातून आपले सैनिक आपल्या जिवाची पर्वा न करता देशाच्या रक्षणासाठी रात्रंदिवस तैनात असल्याचे दिसून येते.

**नॅशनल वॉर मेमोरियलची इतर काही ठळक वैशिष्ट्ये**

राष्ट्रीय युद्ध स्मारकात देशाच्या शूर सैनिकांची नावे सुवर्णाक्षरात कोरली गेली आहेत. याशिवाय सैनिकांची भित्तीचित्रे आणि परमवीर चक्र विजेत्यांचे पुतळेही येथे लावण्यात आले आहेत. राष्ट्रीय युद्ध स्मारक येथे राष्ट्रीय युद्ध संग्रहालय देखील बांधले जात आहे जेथे भारतीय सैन्याने लढलेल्या विविध युद्धांशी संबंधित विविध प्रदर्शने संग्रहित केली जातील. हे म्युझियम शेजारील प्रिन्सेस पार्क परिसरात बांधले जाईल आणि ते भूमिगत बोगद्याद्वारे स्मारकाशी जोडले जाईल. प्रस्तावित राष्ट्रीय युद्ध संग्रहालय मेट्रोने जोडले जाईल. वॉर मेमोरियल आणि म्युझियमच्या बांधकामासाठी ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**राष्ट्रीय युद्ध स्मारकासाठी प्रवेश विनामूल्य**

देशातील सर्व नागरिकांना देशाच्या शूर सैनिकांच्या धैर्याची आणि बलिदानाची माहिती व्हावी, यासाठी राष्ट्रीय युद्ध स्मारकामध्ये प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे, जेणेकरून देशातील अधिकाधिक नागरिकांना शूर सैनिकांची माहिती मिळावी. देशाच्या युद्धस्मारक हे उत्तम प्रेक्षणीय स्थळ म्हणून प्रदर्शित करण्यासाठी येथे एलईडी दिव्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे, जेणे करून रात्रीच्या वेळी युद्धस्मारक भव्य स्वरूपात प्रदर्शित होईल. शूर सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी दररोज संध्याकाळी रिट्रीट सोहळ्याच्या माध्यमातून शूर सैनिकांना बँड पथकाने सलामी दिली जाते. याशिवाय रविवारी विशेष पहारा बदलून (Change of Guard) शहिदांना श्रद्धांजली वाहिली जाते.शूर सैनिकांना हौतात्म्याचे प्रदर्शन करणारे,

राष्ट्रीय युद्ध स्मारक आठवड्याचे सातही दिवस खुले असते. मार्च ते ऑक्टोबर उन्हाळ्यात सकाळी ९ ते संध्याकाळी ७:३० आणि हिवाळ्यात नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत सकाळी ९ ते संध्याकाळी ६:३० या वेळेत तुम्ही राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन देशाच्या शूर सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करू शकता.

पान १ वरुन

### रशियाची चंद्रमोहिम अयशस्वी, ..

गेले आणि त्याची चंद्राच्या पृष्ठभागाशी टक्कर झाली. यामुळे ही मोहिम अयशस्वी ठरली. भारताच्या चांद्रयान–३ ने आंध्रप्रदेशातील श्रीहरिकोटा येथून १४ जुलै रोजी रॉकेटमधून उड्डाण केले होते. तर रशियाने भारतानंतर जवळपास महिन्याभरानंतर ११ ऑगस्ट रोजी सोयूज २.१ बी रॉकेटद्वारे अमूर ओब्लास्टच्या वोस्तानी कॉस्मोड्रोमवरुन प्रक्षेपण केलं होतं. रशिया आणि भारत दोन्ही देश दोन दिवसांच्या अंतराने चंद्रावर उतरणार होते. आता रशियाचं लुना–२५ क्रॅश झाल्यानंतर जगाचं लक्ष भारताच्या चंद्र मोहिमेकडे लागलं आहे.

### 'चांद्रयान–३' साठी चंद्रापासून ..

हळूहळू त्याचा वेग कमी करत चंद्राच्या आणखी जवळ जात आहे. चांद्रयान–३ ने आज पहाटे २ ते ३ च्या दरम्यान महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. विक्रम लँडर चंद्राच्या आणखी जवळ पोहोचलं आहे. आता चांद्रयान–३ चंद्रापासून फक्त २५ किलोमीटर अंतरावर आहे.

चांद्रयान–३ मोहिमेचं पहिलं लक्ष्य चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँडरचे उतरणं आहे. चांद्रयानमधील लँडरचं नाव 'विक्रम' आणि रोव्हरचं नाव 'प्रज्ञान' आहे. विक्रम लँडरच्या यशस्वी लँडिंगनंतर म्हणजेच चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीरित्या उतरल्यानंतर प्रज्ञान रोव्हर त्यातून बाहेर येईल आणि चंद्राच्या पृष्ठभागावर फिरेल. चांद्रयान–३ चं रोव्हर चंद्राच्या पृष्ठभागावर उतरल्यानंतर तेथील माहिती गोळा करुन चंद्राची रहस्यं उलगडण्यास मदत होईल. चांद्रयान–३ चंद्रावर यशस्वीपणे उतरल्यास भारत चंद्रावर उतरणारा चौथा देश ठरेल. त्यामुळे या मोहिमेकडे भारताप्रमाणे जगाचं लक्ष लागलं आहे.

चांद्रयान–३ हे अंतराळयान १४ जुलै रोजी दुपारी २.३५ वाजता बाहुबली रॉकेट एलव्हीएम–३ यशस्वीरित्या अवकाशात झेपावलं. चांद्रयान–३ पृथ्वीपासून चंद्रापर्यंतचा ३.८४ लाख किलोमीटरचा प्रवास केल्यानंतर चंद्राच्या पृष्ठभागावर उतरेल. चांद्रयना–३ मोहिमेतील आतापर्यंतचे सर्व टप्पे ठरल्याप्रमाणे पार पडले आहेत. त्यामुळे सर्व काही नियोजित केल्याप्रमाणे पार पडलं तर, चांद्रयान २३ ऑगस्ट रोजी चंद्रावर उतरण्याची शक्यता आहे.

### निर्यात शुल्क वाढवून सरकारने ..

४० टक्के निर्यात शुल्क लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र यामुळे शेतकरी, व्यापारी, निर्यातदार हे सर्वच संतप्त झाले आहेत. केंद्र सरकारचा हा निर्णय अत्यंत चुकीचा आणि घातक असल्याचं मत ते व्यक्त करत असून या निर्णयाचा फायदा पाकिस्तानला होईल, असं निर्यातदारांचं म्हणणं आहे.

केंद्र सरकारने शनिवारी कांदा निर्यातीवर शुल्क वाढवणारी अधिसूचना जारी केली. हे नवे नियम ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत हे निर्णय लागू राहणार आहे. दरम्यान, शेतकरी आणि व्यापाऱ्यांकडून या निर्णयाचा विरोध करण्यात येत आहे. दरम्यान, वाढत्या महागाईवर नियंत्रण मिळवण्याचा केंद्र सरकारचा हा एक प्रयत्न आहे, असं केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारती पवार यांनी म्हटलं आहे. कांद्याची मागणी वाढली असून भविष्यात जर कांद्याची परिस्थिती टोमॅटोसारखी झाली तर, त्यासाठी आपल्याकडे पुरेसा साठा शिल्लक रहावा, या पार्श्वभूमीवर सरकारने हा निर्णय घेतल्याचं सांगितलं जात आहे.

जगात काय घडतंय, देशात काय घडतंय त्याची माहितीसाठी सोशल मीडियासारखी साधन महत्वाची आहेत. लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी जी काही साधने वापरली जात असतील, ती आपण योग्य पद्धतीने वापरली पाहिजे. राज्यकर्ते सत्तेचा वापर करून साधनाचा गैरवापर करतात. देशाच्या महत्त्वाच्या जागेवर ज्या काही व्यक्ती आहेत, त्यातील एका व्यक्तीने सत्तेचा गैरवापर केला जात आहे.'

### हे शासन कलाकारांना संधी..

या मेहनतीला न्याय देण्याचे काम हे शासन नक्कीच करेल.मुख्यमंत्र्यांनी या स्पर्धेत सहभागी झालेल्या व विजेते ठरलेल्या अन्य राज्यातील छायाचित्रकारांचे आणि अशा प्रकारची स्पर्धा दरवर्षी आयोजित करणाऱ्या ठाणे दैनिक पत्रकार संघाचेही विशेष अभिनंदन केले.

महाराष्ट्र राज्य हे सर्वांना सामावून घेणारे राज्य असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले, पारंपरिक गोष्टींना आता आधुनिकतेची जोड देणे, ही काळाची गरज आहे. हे शासन पायाभूत सुविधा प्रकल्प मोठ्या प्रमाणात उभे करीत आहे. विकासाला प्राधान्य देत आहे. मात्र हे करीत असताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याचीही कटाक्षाने काळजी घेतली जात आहे. ठाणे शहराचाही सर्वांगीण कायापालट होत आहे. लवकरच येत्या काळात आपणा सर्वांना स्वच्छ, सुंदर, विकसित ठाणे शहर आणि जिल्हा पाहायला मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी या राष्ट्रीय स्तरावरील छायाचित्र स्पर्धेतील विजेत्या छायाचित्रकारांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये दीपक जोशी व समीर मार्कंडेय यांचा तसेच राज्य व विभागीय अधिस्वीकृती समितीवर निवड झालेल्या ठाणेकर असलेले पत्रकार संजय पितळे, विनोद जगदाळे, डॉ.दिलीप सपाटे, जयेश सामंत आणि वैभव विरवटकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र पाटणकर यांनी केले.

### ज्येष्ठ रंगकर्मी अशोक सराफ यांना..

संशोधनासाठी सर्व सहकार्य करण्यात येईल अशी ग्वाही देऊन लेखक प्रसाद तारे यांचे त्यांनी अभिनंदन केले. कीर्ति सौरभ प्रतिष्ठानच्या आगामी 'श्रीमंत योगी' नाटकाला सहकार्य करण्यात येईल, असेही पालकमंत्री म्हणाले.

अशोक सराफ म्हणाले, कलेच्या क्षेत्रात विविधता आणण्याचा प्रयत्न करत असताना कलाकाराला मिळणारे प्रेक्षकांचे पाठबळ महत्वाचे आहे, याशिवाय कलाकाराचे प्रयत्न व्यर्थ आहेत. असे पाठबळ कायम महाराष्ट्राच्या रसिकांनी दिले. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी 'जाणता राजा'च्या रूपाने उभ्या केलेल्या नाट्यशिल्पाला तोड नाही. या नाटकात बाजीप्रभू देशपांडे यांच्या भूमिकेला आवाज देऊन या नाटकाशी आपण जोडले गेलो. त्यांच्या नावाने मिळालेल्या पुरस्काराच्या रूपाने बाबासाहेबांना मी आपल्या घरात घेऊन जातो आहे, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी श्री.रावत, लेखक प्रसाद तारे यांनीही विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रसन्न परांजपे यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज घरोघरी पोहोचावेत असा प्रतिष्ठानचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते भारत इतिहास संशोधन मंडळाचे सदस्य प्रसाद तारे यांना पालकमंत्री श्री.पाटील यांच्या हस्ते शिष्यवृत्तीचा धनादेश प्रदान करण्यात आला. त्यांनी लिहिलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज–व्यक्तिमत्वाचे भावदर्शन' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

### राष्ट्रवादीचे माजी आमदार रमेश कदम ..

रमेश कदम हे मुख्य आरोपी आहेत. महामंडळाच्या अध्यक्षपदी असताना बोगस लाभार्थी दाखवून रमेश कदमांनी शेकडो कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या प्रकरणी रमेश कदम यांना आठ वर्षापूर्वी अटक केली होती. याच घोटाळ्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसनं त्यांना पक्षातून निलंबित केलं आहे. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळा घोटाळ्याप्रकरणी माजी आमदार रमेश कदम यांना ऑगस्ट, २०१५ मध्ये अटक करण्यात आली होती.

### टोकाच्या हवामानबदलाचा..

झळ बसलेल्या आगळ्यावेगळ्या भौगोलिक स्थळांच्या सुसंगत नोंदी करणारी विज्ञानपत्रिका 'फ्रंटियर्स इन एनव्हायर्नमेंटल सायन्स'मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका नवीन संशोधन अहवालानुसार अंटार्क्टिकाच्या पश्चिमेकडील टोकाला आणि विशेषतः द्वीपकल्पात बर्फाचा थर मोठ्या प्रमाणात वितळताना दिसला आहे. परिणामी पुढील काही शतकांत समुद्राच्या पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याचा धोका आहे. तर पूर्वेकडील भागात बर्फाचे प्रमाण अनियमितरीत्या वाढत आहे. एक पश्चिम हिमनदी इतक्या वेगाने वितळत आहे की शास्त्रज्ञांनी तिचे 'प्रलयकालीन हिमनदी' (डूम्स डे ग्लेशियर) असे नामकरण केले आहे आणि त्यावर बारकाईने लक्ष ठेवून, त्यामुळे होणारे परिणाम अभ्यासण्याचे आंतरराष्ट्रीय प्रयत्न सुरू आहेत. अंटार्क्टिका सागरातील बर्फ पूर्वी कधीही नव्हे एवढ्या उच्चांकी प्रमाणात कमी झाला आहे. बर्फ घटण्याचे प्रमाण खूप जास्त व धक्कादायक आहे.

हा प्रकार असाच चालू राहिल्यास आणि मानवी हस्तक्षेपामुळे वाढलेल्या प्रदूषणामुळे मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन रोखण्यात अयशस्वी ठरलो तर एकामागून एक येणारे संभाव्य दुष्परिणाम भीषण असतील. सूर्यप्रकाश प्रतिबिंबित करणारा बर्फाचा फार मोठा भाग त्यामुळे नष्ट होईल. जागतिक तापमानवाढ होण्याचे ते एक कारण ठरेल. तसेच वितळलेल्या बर्फाने विद्यमान किनारपट्टीचे प्रदेश पाण्याखाली जातील.

### ललित कला अकादमीचे विभागीय केंद्र महाराष्ट्रात सुरु करण्यासाठी केंद्र व राज्याकडे पाठपुरावा करण्याचे राज्यपालांचे आश्वासन

मुंबई : नवी दिल्ली येथील ललित कला अकादमीचे विभागीय केंद्र महाराष्ट्रात लवकरात लवकर सुरु व्हावे यासाठी आपण व्यक्तिशः लक्ष घालू तसेच केंद्र आणि राज्य शासनाकडे पाठपुरावा करु, असे आश्वासन राज्यपाल रमेश बैस यांनी दिले. सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय येथील प्राध्यापक डॉ. गजानन शेपाळ यांच्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या दृश्यकला विषयक लेखांचे संकलन असलेल्या 'रंगसभा' या पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल श्री. बैस यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडले, त्यावेळी ते बोलत होते.राज्यपाल श्री.बैस म्हणाले, सर्जनशील आणि सांस्कृतिक उद्योग क्षेत्र जगातील अर्थव्यवस्थेत सर्वाधिक गतीने वाढणारे क्षेत्र आहे. कलात्मक वस्तूंचा जागतिक व्यापार सातत्याने वाढत आहे व या क्षेत्रात रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होत आहेत. या संधींचा कलाकारांनी लाभ घ्यावा. कला, शिल्पकला, वारसा, संगीत या क्षेत्रात खासगी क्षेत्राने देखील गुंतवणूक करावी. राज्यातील कला महाविद्यालयांमध्ये हजारो विद्यार्थी कला शिक्षण घेत आहेत. या महाविद्यालयांचे बळकटीकरण करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण केले पाहिजे. या दृष्टीने कला संस्थांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत आपण शासनाला सूचना करू, असेही राज्यपालांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble




## इशिका जनरल स्टोअर्सचे उद्घाटन

अक्कलकोट/निंगप्पा निंबाळः मैंदर्गी येथे भारतीय बौध्द महासभा अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या हस्ते इशिका जनरल स्टोअर्स या दुकानाचे उद्घाटन करण्यात आले.या दुकानात मुख्यत्वे करून शालेय साहित्य, महिलांचे मेकअप सामान, खेळणी साहित्य व इतर वस्तू विकले जाते. यावेळी आरपीआय युवक उपाध्यक्ष कृष्णा धोडमनी, जनरल स्टोअर्सचे मालक बसवराज आरेनावरू,कृष्णा कुरके, नागेश निंबाळ, सोमनाथ माशाळ, यशवंत आरेनवरु, काशिनाथ पोतेनवरू, मल्लिक किरगल, बाबु पोतेनवरू, चिदानंद पोतेनवरू, अनिल विभुते, सुनिल टोणगे, राहुल आरेनवरू, संतोष आरेनवरू, सागर आरेनवरू, राजू गायकवाड, राहुल सोनकांबळे व आदी महिलावर्ग उपस्थित होते.

# पंतप्रधान स्व. राजीवजी गांधी यांच्या पावलावर पाऊल ठेऊन राहुल गांधी कार्य करत आहेत : प्रणितीताई शिंदे

सोलापूर/प्रतिनिधी : भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीवजी गांधी यांच्यासारखा नेता पुन्हा होणे नाही, त्यांच्याच पावलावर पाऊल ठेऊन राहुलजी गांधी कार्य करत असल्याचे मनोगत प्रणितीताई शिंदे यांनी व्यक्त केले

सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने भारतरत्न स्व. राजीवजी गांधी यांच्या जयंती निमित्त आ. प्रणितीताई शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार प्रणितीताई शिंदे, शहराध्यक्ष चेतन भाऊ नरोटे, नगरसेवक विनोद भोसले, मा. नगरसेविका वैष्णवीताई करगुळे, अनुराधा काटकर, प्रवक्ते प्रा.अशोक निंबर्गी सर, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, अंबादास बाबा करगुळे, अल्पसंख्यांक अध्यक्ष जुबेर कुरेशी, ब्लॉक अध्यक्ष देविदास गायकवाड, उपाध्यक्ष बसवराज म्हेत्रे, अनिल मस्के, हाजी मैनुद्दीन शेख, डॉ.आप्पासाहेब बगले, सिद्धाराम चाकोते, सुशील बंदपट्टे, वाहिद बिजापुरे, प्रवक्ते नागनाथ कदम, वशिष्ठ सोनकांबळे, हेमाताई चिंचोळकर, सुमन जाधव, करिमुनिसा बागवान, शोभा बोबे, हारुण शेख, राजन कामत, श्रीकांत वाडेकर, तिरुपती परकीपंडला, पृथ्वीराज नरोटे, विवेक खन्ना, राजेंद्र शिरकुल, संजय गायकवाड, रोहित मन्सावाले, लखन गायकवाड, दीनानाथ शेळके, रुस्तुम कंपली, इलियास शेख, शकील शेख, रफिक चकोले, नूरअहमद नालवार, राजेश झंपले, शिवशंकर अंजनाळकर, कालिदास काळपागार, मेघशम गौडा, पशुपती माशाळ, सुभाष वाघमारे, नागनाथ म्हेत्रे, शोऐब कडेचुर, आकाश वाघमारे,




अंबादास नाटेकर, मनोहर चाकोलेकर, मोहन जंगम, आप्पा सलगर, शिवाजी साळुंखे, हाजी महेमुद शेख, इब्राहिम कलबुर्गी, अभिलाषा अच्छूकटला, संघमित्र चौधरी, मुमताज तांबोळी, अंजली मांगोडेकर, लता गुंडला, मुमताज मदर शेख, नीता बनसोडे, मुमताज शेख, स्नेहल शिंदे, अंबाबाई कांबळे, मनीषा भोसले, वसंती भस्मे, अनिता भालेराव, मीना गायकवाड, आधी बहुसंख्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## कुणबी मराठा विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण

भिवंडी/मिलिंद जाधव : कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत कुणबी व मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी ठाणे जिल्ह्यात एमकेसीलच्या निवडक केंद्रांवर मोफत संगणक व व्यक्तिमत्व विकासाचे प्रशिक्षण दिले जाणार असून, विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ओम शांती कॉम्प्युटर क्लासेस पडघा येथील संचालक संजय पटेल पूजा पवार यांनी केले आहे.

छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र सारथी संस्थेचा उपक्रम महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि. पुणे या प्रशिक्षण संस्थेमार्फत संपूर्ण महाराष्ट्रात तालुकास्तरापर्यंत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कुणबी-मराठा या गटाच्या दहावी पास १८ ते ४५ या वयोगटांतील उमेदवारांकरिता महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात तालुकास्तारांपर्यंत नि:शुल्क (मोफत) व्यक्तिमत्व व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण घेण्यासाठी सारथी लक्षीत गटातील पात्र उमेदवाराकडून ऑनलाइन अर्ज मागवण्यात येत आहेत.

ठाणे जिल्ह्यातील एमकेसीएल निवडक अधिकृत अध्ययन केंद्रावर हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या अभ्याक्रमात विद्यार्थ्यांना स्पोकन इंग्लिश आणि आयटी शिकवले जाणार असून, इतर दोन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनी निवडायचे आहेत. प्रशिक्षणाविषयी संपूर्ण माहिती जाणून घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळाला भेट द्यावी.

## सारथीच्या विविध योजनांबाबत पंढरपूरच्या संतोष डोंगरे यांनी केला जनजागृतीपर प्रसार

पंढरपूर/प्रतिनिधीः छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे या संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती घेवून पंढरपूर येथील संतोष दत्तात्रय डोंगरे यांनी खेडभाळवणी ता.पंढरपूर येथे त्याबाबत जनजागृतीपर प्रसार करण्याचे काम केलेले आहे. यावेळी सरपंच डॉ.संतोष साळुंखे, शुभम पवार, कल्याण पवार,साळुंखे यांच्यासह ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

संतोष दत्तात्रय डोंगरे यांनी सारथी संस्थेची स्थापना त्यांची मुख्य कार्यालये, विभागीय कार्यालय व त्या माध्यमातून मराठा, कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा यांच्यासाठी काम करीत असून तसेच युपीएससी, एमपीएससी, परदेशी भाषा, सेट नेट, एम.फील पीएचडी, छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास, संगणक कौशल्य प्रशिक्षण



कार्यक्रम, श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी कौशल्य विकास कार्यक्रम इंडो जर्मन टूल रूम, राजमाता जिजाऊ सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम,दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना, कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, डॉ.पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना या वर नमूद केलेल्या घटकांसाठी राबविण्या येत असून भविष्यकालीन योजनांचा आराखडा याबाबत वाचन करत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी खेडभाळवणी गावचे सरपंच डॉ.संतोष साळुंखे यांनी संतोष दत्तात्रय डोंगरे यांनी सारथीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तरपणे माहिती पालकांना, विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना दिली त्यामुळे अनेकांना यातून पुढील दिशा मिळणार आहे असे सांगत त्यांचे आभार मानले.

## उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा २४ ऑगस्टला शिबीर दौरा

सोलापूर/प्रतिनिधी : उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अकलूज तर्फे दिनांक १७ ऑगस्ट २०२३ रोजी टेंभूर्णी येथे शिबीर कार्यक्रम नियोजित करण्यात आलेला होता परंतु प्रशासकीय कारणामुळे टेभूर्णी येथील शिबीर कार्यक्रम हा दि. २४ ऑगस्ट २०२३ रोजी नियोजित करण्यात आले असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी कळविले आहे. शिकाऊ तसेच पक्की अनुज्ञप्ती चाचणीसाठी ज्या नागरिकांनी दि. १७ ऑगस्ट २०२३ रोजी पुर्वनियोजित अपॉईंटमेंट घेतलेल्या असतील अशा सर्व उमेदवारांनी दि. २४ ऑगस्ट २०२३ रोजी टेंभूर्णी येथे शिबीर कार्यक्रमात उपस्थित रहावे.

तसेच ज्या उमेदवारांना शिकाऊ किंवा पक्की अनुज्ञप्ती चाचणीसाठी शिबीर कार्यक्रमात उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी कार्यालयामध्ये किंवा पुढील महिन्याच्या शिबीर कार्यक्रमात तारीख घेऊन त्या दिनांकास उपस्थित रहावे. असे आवाहनही उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी केले आहे.



## पंढरपुरात स्व.राजीव गांधी जयंती साजरी

पंढरपूर/प्रतिनिधी :भारताच्या संगणक प्रणालीचे जनक, देशाचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांची जयंती शहर काँग्रेसच्यावतीने सदभावना दिन म्हणून साजरी करण्यात आली.

प्रारंभी प्रतिमेचे पूजन जिल्हा उपाध्यक्ष नागेश गंगेकर यांच्या हस्ते करण्यात आले. जेष्ठ नेते व जिल्हा उपाध्यक्ष बजरंग बागल, शहराध्यक्ष अमर सुर्यवंशी यांनी स्व. राजीव गांधी यांच्या कार्याबद्दलची माहिती दिली. यावेळी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार, तालुकाध्यक्ष हणमंत मोरे, जिल्हा उपाध्यक्ष सुहास भाळवणकर, शंकर सुरवसे, बाबा चव्हाण, शहराध्यक्ष संदिप शिंदे, जेष्ठ नेते नागन्नाथ अधटराव, मिलिंद आढवळकर, पै. द. बडवे, मामासाहेब फलटणकर, देवानंद इरकल, शशिकांत चंदनशिवे, नागेश मिसाळ, दयानंद आटकळे, शिवकुमार भावलेकर यांच्यासह काँग्रेस अंतर्गत विविध कमिटी, सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महर्षी मार्कंडेय महामुनी आर्थिक विकास महामंडळ स्थापन होण्यासाठी पद्मशाली समाज बांधवांची बैठक संपन्न



सोलापूर/प्रतिनिधीः काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र शासनाने लिंगायत वडार गुरव या समाजासाठी आर्थिक महामंडळे स्थापन करून त्यांना किमान ५० कोटी निधी देण्याची घोषणा केली. पद्मशाली समाज केवळ सोलापुरातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात देखील मोठ्या संख्येने आहेत. परंतु आजपर्यंत या समाजाला कोणत्याही स्वरूपात विकास होण्यासाठी शासनाकडून कोणतेही महत्त्व दिले गेले नाही. वीरशैव लिंगायत, वडार, रामोशी, गुरव समाजासाठी जसे आर्थिक महामंडळ स्थापन केले गेले त्याचधर्तीवर पद्मशाली समाजाला सुद्धा महर्षी मार्कंडेय महामुनी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून मिळावे या संदर्भात श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गौरीशंकर कोंडा यांच्या पुढाकारातून रविवार दिनांक २० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सोलापूरातील दाजी पेठेतील श्रीराम मंदिर येथे समाज बांधवांची बैठक बोलावली होती.

या बैठकीत समाजातील गरीब गरजू घटक अत्यंत खडतर अवस्थेत असून त्यांना सुस्थितीत आणून त्यांचा आर्थिक विकास करणेसाठी आर्थिक महामंडळाशिवाय पर्याय नाही ह्या भूमिकेवर एकमत होऊन समाजबांधवांनी आपली मते व्यक्त करताना विविध भागात असलेल्या समाजाला महामंडळाबाबत जागृती करावी, सह्यांची मोहिम राबवावी, स्टीकर, पँम्पलेटद्वारा समाजातील सर्व घटकापर्यंत माहिती पोहचवावी. समाजातील सर्व संघटनांना एकत्रित करुन समाजाची एकता व ताकद निर्माण करुन शासनास निवेदन, आंदोलन माध्यमातून महामंडळ देण्यासाठी भाग पाडावे, कोणत्याही परिस्थितीत मागे न हटता समाजाच्या विकासासाठी संघर्ष करण्याचीसुध्दा तयारी ठेवावी अशी भूमिका मांडली.

या बैठकीत श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गौरीशंकर कोंडा, प्रा. विठ्ठल वंगा, निवृत्त पोलीस निरीक्षक बाबू गंधमल, गणेश पेनगोंडा, सुकुमार सिध्दम,गोपी कृष्ण वड्डेपल्ली, मधुकर कमटम, अमरनाथ सामल, श्रीनिवास रच्चा, वैकुंठम जडल, लक्ष्मीनारायण दासरी, अरविंद बोल्लू, यशोधन यलगम, महेश बिंगी, विक्रम पिस्के, लक्ष्मण भंडारी, हरिदास बोड्डू, वासुदेव लगशेट्टी, व्यंकटेश बुधारम सखी संघमच्या अध्यक्षा ममता मुदगुंडी यांच्यासह आदींची उपस्थिती होते. बैठकीचे समालोचन व्यंकटेश रच्चा यांनी केले तर समारोप, नागेश सरगम यांनी आभार मानले.

## पत्रकार डॉ.विश्वास आरोटे यांनी विद्यार्थ्यांना केले शैक्षणिक साहित्य वितरण



विटाः महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस, पत्रकार, सोबतच आपल्या दातृत्वासाठी संपूर्ण पंचक्रोशीत प्रसिद्ध असणारे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ श्री. विश्वास आरोटे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विठे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा थाळयाची वाडी व ह. भ. प.सावित्राआई माध्यमिक विद्यामंदिर विठे येथील विद्यार्थ्यांना दप्तर व वह्यांचे वाटप आज केले याप्रसंगी विठे ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री.अनिकेत आवारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद विठे शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य श्री. किरण आवारी सर हे होते .श्री विश्वास आरोटे यांनी विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद साधताना परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द ,प्रयत्न व आत्मविश्वास यांच्या बळावर यश नक्कीच मिळवता येते हे विद्यार्थ्यांना आपल्या विविध अनुभवातून सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील यशासाठी व उत्तम भविष्यासाठी शुभेच्छा ही दिल्या .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा परिषद विठे शाळेचे उपक्रमशील शिक्षक श्री. दीपक बोऱ्हाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विठे ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री. अनिकेत आवारी यांनी केले. या कार्यक्रमास ह भ प सावित्राआई माध्यमिक विद्यामंदिर विठे येथील मुख्याध्यापक श्री वैद्य सर, श्री वावळे सर, श्री कोटकर सर हे उपस्थित होते. सोबतच जिल्हा परिषद विठे शाळेचे मुख्याध्यापक श्री. दुंदा ढगे सर, जिल्हा परिषद थाळ्याची वाडी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सोमनाथ घोरपडे सर, जिल्हा परिषद ठाकरवाडी शाळेचे श्री. बांडे सर ,श्रीमती धनवटे मॅडम या सुद्धा उपस्थित होत्या. सर्व विद्यार्थ्यांनी दैनिक समर्थ गावकरी वृत्तपत्र व पत्रकार डॉ. विश्वास आरोटे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

## पत्रकार व छायाचित्रकार यांच्या मुलांसाठी शैक्षणिक उपक्रम राबविणे गरजेचे : संजय धनशेट्टी

सोलापूर/प्रतिनिधीः सद्याच्या स्पर्धेच्या युगात शिक्षण हे काळाची गरज असून पत्रकार व छायाचित्रकार यांच्या मुलांना शैक्षणिक उपक्रम राबविणे गरजेचे असल्याचे मत कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अभियंता संजय धनशेट्टी यांनी व्यक्त केले.

जागतिक छायाचित्रकार दिनाच्या औचित्याने स्वराज्य संघटना व सर्वार्थ सेवा संगम फाऊंडेशन आयोजित प्रेसफोटोग्राफर व राष्ट्रीय न्युज चॅनेल कॅमेरामन यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी दैनिक सोलापूर तरुण भारतचे कार्यकारी संपादक प्रशांत माने, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक आर्वे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, वक्ते आय आय मुजावर, चन्नवीर भद्रेशमठ माजी सैनिक संघटना अध्यक्ष अरुणकुमार तलीखेडे, फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष संदीप वाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रजासेवा न्यूज चॅनेल नागेश श्रीचिप्पा, वृत्तदर्पण न्यूज चॅनेल संदीप जाधव, टी बालाजी न्यूज चॅनेल श्रीनिवास नक्का, स्वरांजली न्यूज इरणणा जुजगार, नागार्जुन राऊळ, यशवंत गुरव, दिनेश शिंदे, इन न्युज, विनोद हुमनाबादकर, नितीन कटके, आदित्य केंगार, अनिल कांबळे, तौसिफ शेख, जगन वाघमारे, मनोज हुलसुरे, आप्पा बनसोडे, राम दास काटकर, सलाउद्दीन शेख, वसीम अत्तार, इरफान शेख, अशोक सोनकटले, तुकाराम शेंडगे, कल्लप्पा गुरव, मल्लप्पा काळे, राजेंद्र बिराजदार, शंकर सोनार, रायप्पा कुंभार, मौनेश्वर सुतार आदींचा स्वराज व्हिजन सन्मान २०२३ स्मृती चिन्ह देऊन सन्मान झाला. संयोजक उद्योजक तथा सर्वार्थ सेवा संगम फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विश्वास थोरात यांनी प्रास्ताविक



केले. ड्रीम फौडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा कार्यक्रम समन्वयक काशिनाथ भतगुणकी यांनी सर्वांचे स्वागत केले.

# डॉ.नरेंद्र दाभोळकरांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त सोलापूर येथे निर्भय मॉर्निंग वॉक




सोलापूर/प्रतिनिधीः डॉ नरेंद्र दाभोळकरांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखा व समविचारी सभा सोलापूर यांनी २० ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता निर्भय मॉर्निंग वॉक काढला. पुणे येथे डॉ नरेंद्र दाभोळकर यांचा डोक्यात गोळ्या घालून निर्घुणपणे खून होऊन दहा वर्षे उलटून गेली तरीही त्यांच्या मारेकऱ्यांना अजूनही शिक्षा झाली नाही, खरा सूत्रधार सापडला नाही याचा निषेध करण्यात आला. डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ अभिवादन करून तसेच डॉ नरेंद्र दाभोळकर यांना २ मि. मौन पाळून आदरांजली वाहून निर्भय मॉर्निंग वॉक ला सुरवात करण्यात आली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेचे कार्यकर्ते तसेच समविचारी सभा यांचे कार्यकर्ते यांनी आम्ही सारे दाभोळकर, हल्लेखोरांनो हाय हाय, विवेकाचा आवाज संपणार नाय, डॉ दाभोळकर अमर रहे, कोण म्हणतो मरून जाईल, दाभोळकर विचार कायम राहील इ अनेक घोषणा दिल्या.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ डॉ नरेंद्र दाभोळकरांच्या बारा पुस्तकांचा लोकार्पण सोहळा सुद्धा प्रा डॉ अर्जुन व्हटकर यांच्या हस्ते करण्यात आला. विवेक वाद, फलज्योतिष, बुवाबाजी, वैज्ञानिक दृष्टिकोन इ अनेक विषयांवर या पुस्तकांमधून डॉ दाभोळकरांचे विचार जनमानसात रुजविले जातील. सदर कार्यक्रमास महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेचे अध्यक्ष प्रा शंकर खलसोडे, कार्याध्यक्ष डॉ अस्मिता बालगावकर, सचिव ब्रह्मानंद धडके, उषा शहा, सरीता मोकाशी, लता ढेरे, यशवंत फडतरे, व्ही डी गायकवाड, निनाद शहा, आर डी गायकवाड, सनी दोशी, धनाजी राउत , शकुंतला सुर्यवंशी, अभिंजली जाधव, निलेश गुरव, आसिफ नदाफ, सरफराज शेख ,दत्ता चव्हाण, किशोर झेंडेकर, राम गायकवाड राहुल जाधव, प्रसाद चव्हाण इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच साने गुरुजी कथामालेचे अध्यक्ष अशोक खानापुरे व शिवलिंग शहाबादे यांच्या सह अनेक समविचारी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

शेवटी महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ आम्ही प्रकाशबीजे, रूजवित चाललो हे गीत गावून कार्यकर्त्यांनी अभिवादन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# जीवनात यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चित करणे आवश्यक : न्यायाधीश इंगळे

कळंब/प्रतिनिधी : राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांनी निर्देशित केल्याप्रमाणे तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण उस्मानाबाद यांचे मार्गदर्शनाखाली तालुका विधी सेवा समिती कळंब विधीज्ञ मंडळ कळंब पोलीस प्रशासन तसेच शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रॅगिंग विरोधी कायदे, वाहतूक नियम, व इतर विषयावर कायदेशीर मार्गदर्शन व्हावे याकरिता दि.१९ ऑगस्ट रोजी विधी साक्षरता शिबिराचे आयोजित करण्यात आलेल्या शिबिरामध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एन.ए इंगळे यांनी मार्गदर्शन करताना जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर हे निश्चित करून त्यानुसार आचरण केले पाहिजे असा मोलाचा सल्ला उपस्थित विद्यार्थ्यांना दिला, कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहाय्यक पोलीस निरीक्षक आर. एन जगताप यांनी वाहतुकीच्या नियमाबाबत सविस्तर माहिती देत हे नियम मोडल्यास होणारी शिक्षा कडक असल्याचे सांगून १८ वर्षाखालील मुलांनी वाहने न चालविण्याचे आवाहन कार्यक्रमाच्या माध्यमातून केले. तसेच पोक्सो कायद्याविषयी मार्गदर्शन करताना अशा प्रकारच्या गुन्हेगारी प्रवृत्ती पासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे, अन्यथा त्याचे भयंकर दुष्परिणाम भोगावे लागतील असे विद्यार्थ्यांना सांगितले. तिसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर एम.ए शेख यांनी रॅगिंग विषयक कायद्याची माहिती देत रॅगिंग केल्यास त्यासाठी असलेल्या कायद्यातील कठोर तरतुदी विषयी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे कृत्य न करता आपले भवितव्य उज्वल करण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे सांगितले. शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील पवार यांनी काळाची गरज असल्याने विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. विधी सेवा समितीचा हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे नमूद करून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतल्यास भविष्यात निश्चित त्याचा उपयोग विद्यार्थ्याला होईल असे मत व्यक्त केले. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर कळंब एन.ए इंगळे हे होते.




तर प्रमुख पाहुणे म्हणून सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आर पी बाटे, तिसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर एम, ए शेख, सहाय्यक पोलीस निरीक्षक आर.एम जगताप, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. सुनील पवार, हे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मयेकर महाविद्यालयातील अरविंद शिंदे, शाहरुख शेख, श्रीकांत भोसले, के .डब्ल्यू पावडे, राम दळवी, संदीप सूर्यवंशी, गाझी मोमीन, न्यायालयीन कर्मचारी इरफान मुल्ला, संतोष भांडे, लखन जाधव, तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, कर्मचारी, पोलीस प्रशासन, तसेच न्यायालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड, एस.आर आगलावे यांनी तर आभार प्रदर्शन अरविंद शिंदे यांनी केले.

# आदिवासी बांधवांच्या कृषिपुरक उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी 'जो जे वांछील ते तो लाहो' प्रमाणे धोरण

नंदुरबार : आदिवासी बांधवांचे जीवनमान, आर्थिकस्तर उंचावण्यासाठी कृषिपुरक उद्योगांना प्रोत्साहन देत, 'दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो, जो जें वांछील तो ते लाहो,' या संत ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे जो जे मागेल त्याप्रमाणे व्यवसायासाठी पाठबळ देण्याचे धोरण शासनाने अवलंबले असल्याचे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी केले आहे. ते सारंगखेडा (ता. शहादा) येथे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ यांच्या आर्थिक सहाय्याने आवल माता मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था, अंतुर्ली यांच्या माध्यमातून, पारंपरिक मच्छिमारांना विविध मासेमारी साहित्य वाटपाच्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी खासदार डॉ. हिना गावित, जिल्हा परिषद सदस्य अरुण ठाकरे, गुलाब ठाकरे, किशोर नाईक, गुलाल भील, ग्रामपंचायत सदस्या रेखा ठाकरे, प्रविण शिरसाठ, दशरथ ठाकरे, सदाशिव मिस्तरी,विठ्ठल मोरे, अशोक मोरे,भोजु मोरे,दिलवर मालचे, सागर भील, दशरथ भील व शहादा तालुक्यातील मच्छिमार बांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री डॉ. गावित म्हणाले, आदिवासी शेतकरी व कष्टकरी बांधवांच्या उत्पन्न वाढीसाठी, ज्या आदिवासी व्यक्तीकडे जमिन आहे, त्यांना कृषि साहित्य, बि-बियाणे उपलब्ध करुन देणे, त्यांच्या शेतात विहिर बांधण्यासाठी अर्थ सहाय्य करणे अशा योजना राबविण्यात येतअसून ज्या आदिवासी व्यक्तींना मच्छिमारी व्यवसाय करावयाचा असेल त्यांना केज फिशिंग सुविधा उपलब्ध करून देणे, ज्यांना जोड धंधा म्हणून दुग्धव्यवसाय करावयाचा आहे, त्यांना दुधाळ जनावरे उपलब्ध करुन देणे, ज्यांना बकरी पालनाचा व्यवसाय करावयचा आहे, त्यांना बकरी उपलब्ध करुन देणे, कृषि व कृषि विषयाशी संबंधित विविध योजना, शासनाचे विभाग व आदिवासी विभागामार्फत विविध योजना सुरू करण्यात आल्या असून आदिवासी बांधवांचे उत्पन्न वाढविणे हा त्यामगचा हेतू आहे.

# युवासेनेने केला कर्नाटक सरकारचा निषेध

## छत्रपति श्री शिवाजी महाराजांची मूर्ती हटविल्याचे प्रकरण

सोलापूर/प्रतिनिधीः कर्नाटकातील बागलकोट येथे सार्वजानिक ठिकाणी बसविण्यात आलेली छत्रपति श्री शिवाजी महाराजांची मूर्ती हटविल्या प्रकरणी युवा सेनेने शनिवारी कर्नाटक सरकारचा निषेध केला. छत्रपति श्री शिवाजी महाराज चौकात युवासेनेने निषेध आंदोलन केले. प्रारंभी युवा सेनेच्या युवासैनिकांनी छत्रपति श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीस दुग्धाभिषेक केला. यानंतर कर्नाटक सरकारचा निषेध करण्यात आला. हिंदूविरोधी कर्नाटक सरकारचा निषेध असो, कर्नाटक सरकारचं करायचं काय, खाली डोकं वर पाय, सिद्धारामैय्या यांचा धिक्कार असो, काँग्रेस सरकारचा धिक्कार असो अशा घोषणा देण्यात येत होत्या.

यावेळी शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे म्हणाल्या, हिंदुस्थानचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपति श्री शिवाजी महाराजांची मूर्ती हटविण्याचे महापाप काँग्रेस सरकारने केले आहे. ज्या काँग्रेसने छत्रपति श्री शिवरायांच्या मूर्तीस बुलडोझर लावला आहे त्या काँग्रेसला जनता आगामी निवडणुकांमध्ये बुलडोझर लावणार आहे. छत्रपति श्री शिवरायांच्या मूर्तीला अनधिकृत म्हणणारे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचे यांची भूमिकाच अनधिकृत आहे. ठाकरे गटाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांनीही याबाबत सोयीस्कर मौन बाळगले आहे. त्यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी कर्नाटकतील काँग्रेस सरकारचा निषेध करावा, असे आव्हानही शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी दिले.

युवा सेनेचे जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे म्हणाले, छत्रपति श्री शिवाजी महाराजांची मूर्ती भारतातील प्रत्येक गावात असणे आवश्यकच आहे. असे असतानाही बसविलेली मूर्ती काढून टाकण्याचा नतद्रष्टपणा काँग्रेसने केला आहे.




त्याचा आम्ही युवासेनेतर्फे निषेध करीत आहोत. याप्रसंगी शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, युवासेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, युवासेना शहर प्रमुख अर्जुनसिंग शिवसिंगवाले, युवासेना उपशहर प्रमुख अभिजीत काळे, उपशहर प्रमुख अल्फान आबादिराजे, उपशहर प्रमुख सूर्योदन सुतार, उपशहर प्रमुख आशिष परदेशी, दिपक पाटील, स्वप्निल कांबळे, नागेश रोकडे, निहाल शिवशिंगवाले, मोहन जंगम, दत्ता कोपलवार, लखन म्हेत्रे, अभिषेक म्हेत्रे, भीमा वाघमारे, रोहन वड्डेपल्ली, सचिन गुंटनोळ आदी उपस्थित होते.

# अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय कार्यकारणीवर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून आमदार प्रणिती शिंदे यांची निवड

सोलापूर/प्रतिनिधीः अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय नेत्या सोनिया गांधी खासदार राहूल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोलापूर शहर मध्यच्या आमदार प्रणिती शिंदे यांची अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय कार्यकारणीवर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ति करण्यात आली.

काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्या सोनिया गांधी, खासदार मा. राहूल गांधी यांनी काँग्रेसच्या राष्ट्रीय राजकारणात युवकांना संधी देवून राष्ट्रकार्यात समाविष्ठ करण्याचे धोरण अवलंबले असून यानुसारच युवा आमदार प्रणिती शिंदे यांना राष्ट्रीय स्तरावर कार्यकारणीत काम करण्याचा बहुमान मिळाला आहे. युवा आमदार प्रणिती शिंदे या सन २००९ पासून आमदार म्हणून कार्यरत आहेत. सलग ३ निवडणुका जिंकुन त्यांनी आपल्या



विधायक कार्याचा ठसा उमटविला आहे. युवकांच्या शिक्षणापासून ते रोजगारापर्यंतच्या कामात त्या सातत्याने कार्यरत असतात. महिला आमदार म्हणून युवतींच्या, महिलांच्या समस्यांना वाचा फोडणे व शासनाकडून त्यांचे निराकरण करण्याचे काम त्या अहोरात्र करीत आहेत.महाराष्ट्रातील गरीब, कामगार,विडी कामगार, यंत्रमाग कामगार, असंघटीत कामगार, सफाई कामगार, कष्टकरी, शेतकरी, शेत मजूर, निराधार, दिव्यांग, अपंग, अंध, विधवा, परितक्त्या, असाध्यरोगग्रस्त, भटके विमुक्त, निराश्रीत, उपेक्षित, अन्यायग्रस्त, कुष्ठरोगी, आदिवासी या वर्गातील नागरीकांना व त्यांच्या कुटुंबायांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करून त्यांचे जिवनमान उंचाविण्याचे, त्यांच्या जिवनात सुख-समृध्दी सुरक्षितता निर्माण करण्याचे व गरीबांचे जिवन आनंदी करण्याचे महत्वपूर्ण व कसोटीचे काम आमदार प्रणिती शिंदे या करीत असून शासकीय चौकट व मर्यादा भेदून गोर-गरीबांना मदत पोहोचविण्याचे कौशल्य त्यांनी आपल्या कठोर परिश्रमातून व प्रचंड मेहनतीने साध्य केल आहे.

कर्तत्वदक्ष आमदार प्रणिती शिंदे यांच्या याच प्रामाणिक कार्याची दखल घेवून त्यांना राष्ट्रीय राजकारणात काम करण्याची व योगदान देण्याची महत्वपूर्ण जबाबदारी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते सोनिया गांधी, खासदार राहुल गांधी, राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोपविली आहे.

या सार्थ निवडीबद्दल त्यांची कर्मभुमी सोलापूर शहर, जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांत व सर्वसामान्य नागरीकांमध्ये चैतन्य पसरले आहे.

# जिल्हा विकास आराखड्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले कौतुक

## पर्यटन विकासातून रोजगार वृद्धीसाठी सर्वतोपरी मदत करण्याची मुख्यमंत्री यांची ग्वाही

सातारा : जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पालकमंत्री शंभूराजे देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी अत्यंत चांगला विकास आराखडा सादर केला आहे असे सांगून जिल्ह्यातील पर्यटन क्षमता वृद्धिंगत करून त्याद्वारे रोजगार निर्मितीसाठी शासन सर्वतोपरी मदत करील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



सातारा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याचे सादरीकरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती. सातारा जिल्हा हा अत्यंत वैविध्यपूर्ण निसर्ग संपदा लाभलेला संपन्न जिल्हा आहे. या जिल्ह्याला ११० किलोमीटरचा कोयनेचा बॅकवॉटरचा पट्टा लाभला आहे. या जिल्ह्यात जंगले आहेत, प्राणी आणि पक्षी अभयारण्य आहेत, मंदिरे, गड, किल्ले, धबधबे, पठारे आहेत. अशा स्थितीत पर्यटनाचा विकास झाल्यास जिल्ह्यातून नोकरी धंद्यासाठी बाहेरगावी जाणारा युवकाला आपल्याच मायभूमीत रोजगार उत्पन्न होईल या दृष्टीने जिल्ह्यातील पर्यटन वृद्धीच्या क्षमता ओळखून अत्यंत चांगला आराखडा जिल्हा प्रशासनाने तयार केला आहे. जिल्ह्यातील तरुणांना आपल्याच गावात राहून रोजगार उपलब्ध व्हावा त्याला इतर शहरांमध्ये रोजगारासाठी जायला लागू नये. किंबहुना रोजगारानिमित्त इतर शहरात गेलेले तरुण पुन्हा आपल्या मायभूमीत परत यावेत, या उद्देशाने जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी आवश्यक ती सर्व मदत शासनाच्या माध्यमातून दिली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी मोठ्या प्रमाणावर रस्त्यांचे जाळे वाढवत आहोत. असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, अनेक वर्षापासून रखडलेल्या तापोळा पुलाचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. बामणोली ते दरे आणि आपटी ते तापोळा अशा दोन पुलांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र जोडण्यासाठी हे पूल अत्यंत महत्त्वाचे ठरतील आणि याचा फायदा पर्यटन वाढीलाही होईल. महाबळेश्वर तापोळा रस्त्याचे रुंदीकरण आणि मजबुतीकरण सुरू आहे मुनावळे येथे पर्यटकांसाठी आकर्षण स्थळे विकसित करण्यासाठी निधी देण्यात आला आहे. रोजगारासाठी युवकांना उद्युक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासन व शासन प्रयत्नशील आहे.असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी त्यांनी जिल्ह्यात बांबू लागवड उपक्रम मिशन मोडवर हाती घेण्यात आला असून याचा शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी फायदा होईल यामध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांनी बांबू लागवडीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही केले.

# बाल शक्ती पुरस्कार व बाल कल्याण पुरस्काराकरिता अर्ज मागविणे सुरू

मुंबई : केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत बाल शक्ती पुरस्कार व बाल कल्याण पुरस्कार २०२४ करिता केंद्र शासनाने अर्ज मागविलेले आहेत. हे अर्ज www.awards.gov.in या संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. सदर पुरस्कारांची माहिती सदरच्या संकेत स्थळावर देण्यात आलेली आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत आहे. तरी सदरचे अर्ज हे वर दिलेल्या संकेतस्थळावर विहीत वेळेत अपलोड करण्यात यावे, असे आवाहन मुंबई उपनगरचे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी बी. एच.नागरगोजे यांनी केले आहे.

बाल शक्ती पुरस्कार ज्या मुलांनी (वय ५ पेक्षा अधिक व १८ वर्षापर्यंतच्या) शिक्षण,कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नावीण्यपूर्ण शोध,

सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे, त्यांना हा पुरस्कार दिला जातो.बाल कल्याण पुरस्कार हा वैयक्तिक व संस्थास्तरावर दिला जातो. वैयक्तिक पुरस्कारामध्ये मुलांच्या विकास, संरक्षण व कल्याण या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे वेतन अथवा मानधन न घेता मानसेवी उदात्त भावनेतून किमान सात वर्ष काम करणाऱ्या व्यक्तिस हा पुरस्कार दिला जातो. संस्थास्तरावर बाल कल्याण क्षेत्रात अपवादात्मक कार्य करणाऱ्या संस्थेला हा पुरस्कार दिला जातो, संस्था पूर्णतः निधीवर अवलंबून नसावी. बाल कल्याण क्षेत्रात किमान १० वर्षे सातत्यपूर्ण उत्कृष्ट कार्य करणारी असावी.

पुरस्कारासाठीचे अर्ज www.awards.gov.in संकेत स्थळावर विहीत वेळेत अपलोड करण्यात यावेत, असे आवाहन मुंबई उपनगरचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.